संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# कर आहे तर डर कशाला?

**भारताच्या** अर्थव्यवस्थेत मूलभूत परिवर्तन करणाऱ्या नव्या कर आकारणीला येत्या १ जुलैपासून सुरुवात होणार आहे. वस्तू आणि सेवा कराच्या सुधारित मसुद्याना लोकसभेने दिलेली मंजुरी एका नव्या आर्थिक प्रवासाची नांदी ठरू शकेल. हे विधेयक लागू होत असताना त्याचे सगळे यश हे अंमलबजावणीच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असेल. कारण १९९० च्या दशकात असाच फार मोठा आर्थिक सुधारणांचा प्रवास सुरू झाला होता. आज २५ वर्षांनंतर त्याची परिस्थिती काय, असा प्रश्न विचारला तर इतिहासाने एक मोठे वळण घेतले खरे. परंतु, त्याचे जे व्यापक परिणाम अपेक्षित होते, ते एवढे आढळून आलेले नाहीत. प्रामुख्याने औद्योगिक उत्पादनात भारत मोठी झेप घेईल. बहुराष्ट्रीय कंपन्यांना आमंत्रण दिल्याने भारताच्या परकीय गंगाजळीत वाढ होईल. एकूण रोजगाराचे प्रमाण वाढेल आणि सरतेशेवटी देशाचा ग्रामीण भाग विकासाच्या मुख्य प्रवाहाशी जोडला जाईल, असे साधारणपणे गृहीत धरले गेले होते. आता यापैकी काय काय झाले याचे उत्तर शोधले तर औद्योगिक उत्पादनात वाढ झाली. परंतु, प्रत्यक्ष रोजगारात वाढ झाली नाही. औद्योगिक वाढीचा प्रत्यक्ष लाभ ग्रामीण भागाला मिळाला नाही. आजही तो मिळत नाही. या आर्थिक सुधारणांमुळे सर्वात जास्त फायदा हा बहुराष्ट्रीय कंपन्यांना झाला. अनेक प्रकारच्या सवलती त्यांनी पदरात पाडून घेतल्या. त्यासोबत आपल्याच देशातील ठरावीक तेही मूठभर उद्योग घराणांनी आर्थिक सुधारणांचा फायदा भरपूर प्रमाणात घेतात. मग सवलतीच्या जागा मिळवण्यापासून ते वेगवेगळ्या करसवलती उपटण्यापर्यंत या आर्थिक सुधारणा वापरून घेतल्या गेल्या. प्रत्यक्षात ग्रामीण भागातला छोटा किंवा लघुउद्योजक मोठा होऊ शकला नाही. म्हणजे आर्थिक सुधारणांमुळे देशाचे आर्थिक प्रकृतिमान सशक्त झाले, असे अभिमानाने सांगता येत नाही. आता त्याचाच एक पुढचा टप्पा म्हणून जर या वस्तू सेवाकर रचनेकडे पाहिले तर प्रामुख्याने एकूण केंद्र आणि राज्याच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होणे अपेक्षित आहे. वेगवेगळ्या करांमुळे कर चुकवेगिरी होत होती. ती आता रोखली जाईल, असा केंद्र सरकारचा दावा आहे. अगदी प्रारंभापासून संपूर्ण देशभर एकत्र करप्रणाली असावी. म्हणजे या समान कर कररचनेतून देशामधल्या सामाजिक समानतेला प्रोत्साहन मिळेल, अशीही भावना व्यक्त होत आहे. इतका व्यापक परिणाम असणारी ही नवी करव्यवस्था यशस्वीपणे राबवण्यासाठी तेवढीच पूर्वतयारी गरजेची ठरते. या कररचनेसाठी तब्बल दहा वर्षांपूर्वी प्रस्ताव मांडला गेला होता. जगातल्या काही प्रमुख देशात अशीच वस्तू व सेवाकर योजना आहे. परंतु, अमेरिका-इंग्लंड यासारख्या युरोपीय राष्ट्रांत व्यवस्था नाही, हेही लक्षात घेतले पाहिजे.

### अंमलबजावणीचे आव्हान

भारतासारख्या विकसनशील देशाला समान कर व्यवस्थेची गरज होती. ती यानिमित्ताने पूर्ण होणार आहे. याचा अपेक्षित परिणाम म्हणून कर बुडवेगिरी कमी होऊन देशाच्या उत्पन्नात वाढ होणे, भ्रष्टाचार कमी होणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अनेक वस्तू आणि सेवांच्या किमती किंवा दरात कपात होणे अपेक्षित आहे. अर्थातच या सगळ्या गोष्टी अंमलबजावणीवर अवलंबून आहेत. कदाचित या कर सुधारणेमुळे एक चांगली करपध्दती अस्तित्वात येईल. परंतु ती राबवणारी व्यवस्था जर चांगली नसेल तर मात्र त्याचा काहीही उपयोग नाही. साधारणपणे या नव्या रचनेतून एकूण २८ टक्क्यांपर्यंत कर लावले जाणार आहेत. त्याचे चार टप्प्यात विभाजन केले गेले आहे. प्रामुख्याने विविध वस्तू आणि सेवांवरचा कर हा खऱ्या अर्थाने १८ टक्क्यांपर्यंत राहील. मात्र काही चैनीच्या वस्तू, मद्य, यावर मात्र २८ टक्क्यांपर्यंत कर बोजा राहील असे दिसते. ज्या चार टप्प्यांत विभागणी झालेली आहे, ती पाहिल्यानंतर एक देश आणि एकच सर्वत्र एकच कर अशी जी काही मूळ कल्पना होती, ती साध्य होऊ शकलेली नाही. पुन्हा चार प्रकारे कर आकारला जाणार असल्यामुळे तो बुडवण्याकडे लोकांचा कल राहील. आपल्याकडे एक जुनी म्हण आहे, 'ज्याने काही केले नाही, त्याला कशाचीही भीती नाही', म्हणजेच कर नाही त्याला डर कशाला आणि म्हणून ही कररचना लागू करत असताना कर भरण्याची प्रवृत्ती वाढेल, याची आज खात्री देता येत नाही. कर चुकवण्याची शक्यता राहील. वा कोणालाही संधी मिळणार नाही, अशी ग्वाही या कररचनेत दिली गेलेली नाही.

### महागाई, भ्रष्टाचार कमी व्हावा

अलीकडेच नोटाबंदीचा प्रयोग झाला. काळा पैसा बाहेर काढण्याकरिता केवढी मोठी जोखीम स्वीकारली गेली. तरीही काळा पैसा शिल्लक राहिलाच आहे. लाचखोरी, भ्रष्टाचार चालूच आहे. हे उदाहरण डोळ्यासमोर असल्यामुळे तब्बल दहा वर्षांच्या प्रयत्नानंतर अस्तित्वात येणारी ही रचना कितपत यशदायी ठरेल, याबद्दल काही सांगता येत नाही. हेतू किंवा उद्देश जर चांगला होता, तर आपल्या देशाच्या संसदेला ही व्यवस्था लागू करण्याकरिता दहा वर्षे का लागावीत, म्हणजेच एखादा चांगला निर्णय घेण्यासाठीसुध्दा दहा दहा वर्षे राजकारण केले जाते. या चांगल्या निर्णयाची अंमलबजावणी करताना कितपत कठोरता दाखवली जाईल, त्याबद्दल शंकाच वाटते. आतापर्यंत भारतीय संसदेने अनेक चांगले मोठे निर्णय किंवा कायदे केलेले आहेत. परंतु, त्यांची अंमलबजावणी किंवा परिणाम प्रभाव पाडू शकलेला नाही. त्यातल्या त्यात चांगली गोष्ट एवढीच आहे की, भरमसाठ स्वरूपात असलेले कर काही प्रमाणात आता सुसूत्र झालेले आहेत. स्वातंत्र्याच्या सत्तर वर्षांत कर सुधारण्याची ही प्रगती तशी वैशिष्ट्यपूर्णच ठरते. अर्थातच कररचनेची चांगली व्यवस्था निर्माण करूनही कर चुकवणारे तर कर चुकवतीलच. कारण कायदा करतानाच पळवाटांचीही व्यवस्था असते. 'कर' नाही त्याला 'डर' कशाला याऐवजी कदाचित आता कर आहे तर डर कशाला एवढाच काय तो फरक म्हणता येऊ शकेल. मात्र कर भरण्याची प्रवृत्ती या व्यवस्थेतून वाढीला लागली पाहिजे. अन्यथा एक सरकारी कर्मकांड पार पाडले, एवढाच त्याचा अर्थ होईल. यात सामान्य माणसाला जो दिलासा अपेक्षित आहे, तो मिळाला पाहिजे. भ्रष्टाचार कमी झाला पाहिजे.